Scan QR code to visit... Epaper Portal

दैनिक

# सह्याद्रीचा राखणदार

www.sahyandrinews.com

Scan QR code to visit... Epaper Portal

• संस्थापक संपादक : मारोती नारायण घुमे •

• (महाराष्ट्र) • वर्ष ०१ वे • अंक ५७ • Title - Code :- MAHMAR49513 • रविवार दि.१९ नोव्हेंबर २०२३ • पाने ४ • पान १ • मो. ९०११७ ०८८४० • किंमत २ रु.

# आज भारत तिसऱ्यांदा विश्वविजेता होणार ?

## पीएम नरेंद्र मोदींबरोबर ऑस्ट्रेलियाचे उपपंतप्रधान पाहणार फायनल सामना

अहमदाबाद-एकदिवसीय विश्वलचषक २०२३चा अंतिम सामना भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर होणार आहे. रविवारी होणारा हा सामना पाहण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदीही स्टेडियममध्ये पोहोचणार आहेत. होय, गेल्या दोन दिवसांपासून बातम्यांमधून ही चर्चा सुरु होती. पण, आता या ऐतिहासिक फायनलचा आनंद घेण्यासाठी पीएम मोदी स्टेडियममध्ये पोहोचणार असल्याचे निश्चित झाले आहे. पीएम फायनलमध्ये सहभागी होण्यासाठी पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी संध्याकाळी अहमदाबादला पोहोचणार आहेत. त्यांच्याबरोबर हा सामना पाहण्यासाठी ऑस्ट्रेलियाचे उपपंतप्रधान रिचर्ड मार्ल्स हे देखील दिसतील.पंतप्रधान नरेंद्र मोदी रविवारी संध्याकाळी साडेचार ते पाचच्या सुमारास अहमदाबाद विमानतळावर पोहोचतील. तत्पूर्वी, पंतप्रधान राजस्थानमधील तारानगर आणि झुंझुनू येथे सभांना संबोधित करतील आणि त्यानंतर गुजरातला रवाना होतील. संध्याकाळी ते अहमदाबाद विमानतळावर पोहोचतील आणि त्यानंतर थेट राजभवनाकडे रवाना होतील. त्यांच्या स्वागतासाठी गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल येथे उपस्थित राहण्याची शक्यता आहे.अशाप्रकारे ते संध्याकाळी ५ नंतर कधीही नरेंद्र मोदी क्रिकेट स्टेडियमवर फायनल सामना पाहण्यासाठी पोहोचतील. या काळात आसाम आणि मेघालयसह दोन ते तीन राज्यांचे मुख्यमंत्रीही विश्वचषकाचा फायनल सामना पाहण्यासाठी सहभागी होणार आहेत. अंतिम सामन्यानंतर (पीएम मोदी) पुन्हा एकदा राजभवनात जातील, जिथे ते रात्रीचे जेवण करतील आणि रात्री मुक्काम करतील. त्यानंतर सोमवारी ते गुजरातमधून राजस्थानला निवडणूक प्रचारासाठी रवाना होतील.भारताचा पहिला विश्वचषक विजेता कर्णधार कपिल देवही हा सामना पाहण्यासाठी येणार आहेत. त्यांच्याशिवाय २०११ मध्ये टीम इंडियाला चॅम्पियन बनवणारा महेंद्रसिंग धोनीही स्टेडियममध्ये दिसणार आहे. त्याचबरोबर इतर संघाचे विश्वचषक विजेते कर्णधारही उपस्थित राहणार आहेत. राजीव शुक्ला, अमित शाह, जय शाह आणि अनेक सेलिब्रेटी आणि दिग्गज उद्योगपती अंतिम सामन्याचा आनंद घेण्यासाठी स्टेडियमवर पोहोचतील.अंतिम सामन्यापूर्वी अहमदाबादचे पोलीस आयुक्त ज्ञानेंद्र सिंग मलिक म्हणाले, ऑस्ट्रेलियाचे उप-पंतप्रधान, आसामचे मुख्यमंत्री, केंद्रीय गृहमंत्री आणि इतर मान्यवर भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यातील क्रिकेट विश्वचषक फायनल पाहण्यासाठी येणार आहेत. सर्व व्यवस्था करण्यात आली आहे. आज आम्ही संध्याकाळी रिहर्सल करणार आहोत. मी लोकांना मेट्रोचा वापर करण्याचे आवाहन करतो आणि मेट्रो रात्री १ वाजेपर्यंत सुरू राहील.



# बल्लारपूर बायपासवर झालेल्या अपघातातील मृतांच्या कुटुंबियांना २० लाखांची मदत

## ना.सुधीर मुनगंटीवार यांच्या पाठपुराव्यानंतर मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून तरतूद

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

सप्टेंबर महिन्यात बल्लारपूर बायपासवर ट्रक आणि ऑटोरिक्षाच्या भीषण अपघातात चार जणांचा मृत्यू झाला होता. या अपघातातील मृतांच्या कुटुंबियांना वने व सांस्कृतिक कार्य तथा पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्या प्रयत्नांनंतर मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून आर्थिक मदत जाहीर झाली आहे. ना मुनगंटीवार यांनी शासनाकडे तातडीने प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाला दिल्या होत्या. त्यानंतर त्यांनी सातत्याने पाठपुरावा केला आणि दीड महिन्याच्या कालावधीत चारही मृतांच्या कुटुंबांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून प्रत्येकी पाच लाख रुपये याप्रमाणे एकूण २० लाख रुपयांची मदत जाहीर झाली आहे.२७ सप्टेंबर २०२३ रोजी बल्लारपूर बायपासवर ट्रक आणि ऑटोरिक्षा यांच्यात भीषण अपघात झाला. यात राजकला मोहुर्ले, इरफान खान (रा. बाबुपेठ, चंद्रपूर), अनुष्का खेरकर (रा. बल्लारपूर) आणि संगिता अनिल चहांदे (रा. साईनगर, गडचिरोली) या चार जणांचा




मृत्यू झाला. मृतांच्या कुटुंबियांना मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मदत मिळावी यासाठी महाराष्ट्र ऑटो रिक्षा चालक-मालक संघटनेचे संस्थापक अध्यक्ष राजेंद्र खांडेकर आणि जिल्हाध्यक्ष मधुकर राऊत यांनी पालकमंत्री सुधीर मुनगंटीवार यांच्याकडे मागणी केली होती. या मागणीची त्वरित दखल घेत ना. मुनगंटीवार यांनी जिल्हा प्रशासनाला मुख्यमंत्री सहाय्यता निधीसाठी प्रस्ताव पाठविण्याच्या सूचना दिल्या. त्यानुसार जिल्हा प्रशासनाने २५ ऑक्टोबर २०२३ रोजी शासनाकडे अर्थ सहाय्याकरिता प्रस्ताव पाठविला. प्रस्ताव पाठविल्यानंतर ना . मुनगंटीवार यांनी विशेष लक्ष दिले आणि सातत्याने पाठपुरावा केला.प्रस्ताव पाठविल्यानंतर २० दिवसांच्या आतच मुख्यमंत्री सचिवालयाने मृतांच्या कायदेशीर वारसदारांना प्रत्येकी पाच लक्ष रुपये याप्रमाणे चारही कुटुंबांसाठी २० लक्ष रुपये इतके अर्थसहाय्य मुख्यमंत्री सहाय्यता निधीतून मंजूर केले आहे. हा निधी स्टेट बँक ऑफ इंडियाच्या मुंबई शाखेतून, चंद्रपूर जिल्हाधिकारी कार्यालयाचे खाते असलेल्या स्टेट बँक ऑफ इंडिया, जटपुरा गेट शाखा, चंद्रपूर येथील बँक खात्यात परस्पर वर्ग करण्यात आला आहे.

# चंद्रपूर शहराच्या बायपास प्रकल्पाची अंमलबजावणी तातडीने करा-चोखारे

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

चंद्रपूर हे महाराष्ट्रातील एक प्रमुख औद्योगिक शहर आहे. शहराची लोकसंख्या झपाट्याने वाढत आहे. यामुळे शहरातील वाहतूक व्यवस्था कोलमडून पडली आहे. शहरातील वाहतूक कोंडी कमी करण्यासाठी बायपास काढण्याचा प्रस्ताव मंजूर झाला होता. परंतु, प्रकल्प अद्यापही प्रलंबित आहे.

या प्रकल्पाची अंमलबजावणी तातडीने करण्याची मागणी भूमिपुत्र युवा संघटनेने केली आहे. काँग्रेस नेते व भूमिपुत्र युवा संघटनेचे संयोजक दिनेश दादापाटील चोखारे यांनी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांना निवेदन दिले आहे.निवेदनात म्हटले आहे की, चंद्रपूर शहराच्या मध्यभागीून राष्ट्रीय महामार्ग जातो. या महामार्गावरून दररोज हजारो वाहने ये-जा करतात. यामुळे शहराच्या मध्यभागी वाहतूक कोंडी होत असते. या कोंडीमुळे वाहनचालकांना अनेक तास थांबावे लागतात. यामुळे नागरिकांना



आर्थिक आणि मानसिक त्रास होत आहे.चंद्रपूर शहराच्या बाहेरून बायपास काढण्याचा प्रस्ताव मंजूर झाला होता. परंतु, अद्यापही या प्रकल्पाची अंमलबजावणी सुरू झालेली नाही.बायपास रस्ता झाल्यास शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यास मदत होईल. यामुळे नागरिकांना वाहतूक कोंडीचा त्रास होणार नाही. तसेच, शहराची वाहतूक व्यवस्था सुव्यवस्थित होईल.या पार्श्वभूमीवर, मुख्यमंत्री शिंदे यांनी चंद्रपूर शहराच्या बायपास प्रकल्पाची तातडीने अंमलबजावणी करण्यासंदर्भात आवश्यक निर्देश द्यावेत, अशी विनंती निवेदनात करण्यात आली आहे.

# जेष्ठ नागरिकांसह आमदार किशोर जोरगेवार यांनी साजरी केली दिवाळी

## स्नेहमिलन व फराळ कार्यक्रमाचे आयोजन



**चंद्रपूर । प्रतिनिधी**

दिवाळी निमित्त आमदार किशोर जोरगेवार यांनी जेष्ठ नागरिकांच्या दिवाळी स्नेहमीलन कार्यक्रमाचे आयोजन केले होते. यावेळी आमदार किशोर जोरगेवार यांच्या राजमाता निवासस्थानी आयोजित या स्नेहमिलन कार्यक्रात जेष्ठ नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

यावेळी आमदार किशोर जोरगेवार, गंगुबाई उर्फ अम्मा जोरगेवार, माता महाकाली सेवा सामोतीचे सचिव अजय जयस्वाल, माजी नगराध्यक्ष डॉ. सुरेश महाकुलकर, डॉ. अशोक वासलवार, डॉ. किर्तिवर्धन दिक्षित, विजय चंदावार, श्याम धोपटे, कल्पना पलीकुंडावार, सुर्यकांत खनके, उमेश आष्टनकर, डॉ. रजनिकांत भलमे, ॲड. विजय मोगरे, ॲड. दत्ता हजारे, पसायदान जेष्ठ नागरिक संघाचे विश्वनाथ तामगाडगे, बिंदुबाबू बडकेलवार, द्रोपती काटकर, राधाकृष्ण जेष्ठ नागरिक संघाचे अध्यक्ष चंद्रशेखर गुन्नुरवार, विनेश रामानुजनवार, विलास बडवाईक, महादेव पिंपळकर, अशोक संगीडवार, वासुदेव सादमवार, पुरुषोत्तम राऊत, माणिकराव गोहोकार आदींची प्रामुख्याने उपस्थिती होती.सध्या सर्वत्र दिवाळी उत्सव मोठ्या उत्साहाज साजरा केल्या जात आहे. आमदार किशोर जोरगेवार यांनीही यंदाची दिवाळी ज्येष्ठ नागरिकांसह साजरी करत त्यांना फराळासाठी घरी आमंत्रित केले होते. यावेळी पार पडलेल्या स्नेहमीलन कार्यक्रमाला ज्येष्ठ नागरिकांचाही उस्फुर्त प्रतिसाद लाभला. या प्रसंगी विविध विषयांवर आमदार किशोर जोरगेवार यांनी ज्येष्ठ नागरिकांशी चर्चा केली. खेळीमेळीच्या वातावरणात हा कार्यक्रम पार पडला.जेष्ठ नागरिकांसह दिवाळी साजरी करतांना आनंद होत आहे. दरवर्षी दिवाळी निमित्त आपण हा कार्यक्रम आयोजित करणार आहोत. जेष्ठांसोबत वेळ घालवून त्यांच्या विचारातून आलेल्या सूचना चंद्रपूर जिल्ह्याच्या विकासासाठी उपयोगी ठरणार आहे. आपल्याकडे विचारांची मोठी ठेवी आहे. आपल्या विचारांचा उपयोग समाज परिवर्तनासाठी होणे अपेक्षित आहे. आपल्याला भेटल्या नंतर वैचारिक शक्तीत वाढ होते. अनेक नव्या गोष्टी आपल्याकडून शिकायला मिळते असे यावेळी आमदार किशोर जोरगेवार म्हणाले. ज्येष्ठ नागरिकांच्या अडचणींचीही मला कल्पना आहे. जेष्ठ नागरिकांनी एकत्रित येत बहुमुल्य विचारांची देवाण घेवाण करावी यासाठी मतदार संघातील जेष्ठ नागरिक संधांचा विकास करण्याचे काम आपल्या वतीने सुरु असल्याचे ते यावेळी म्हणाले. या कार्यक्रमाला जेष्ठ नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# गोकुळनगर, विसापूर मार्गावरील नागरिकांना वाटली ब्लँकेटसह मिठाई

## गोरगरीबांच्या चेहऱ्यावरील आनंद समाधान देणारा उपक्रम-खा.नेते

**गडचिरोली । प्रतिनिधी**

दिवाळीच्या निमित्ताने गडचिरोली शहराच्या विविध भागातील गोरगरीब नागरिकांना खासदार अशोक नेते यांच्यासह भाजपचे जिल्हाध्यक्ष प्रशांत वाघरे आणि पदाधिकाऱ्यांनी मिठाई, तसेच थंडीपासून बचावासाठी ब्लँकेटचे वाटप केले. शुक्रवारी गोकुळनगर आणि विसापूर मार्गावर अनेक नागरिकांनी याचा लाभ घेतला. यावेळी त्या नागरिकांच्या चेहऱ्यावर दिसलेला आनंद मानसिक समाधान देणारा आहे, अशी भावना यावेळी खासदार अशोक नेते यांनी व्यक्त केली.



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या आवाहनानुसार खासदार तथा भाजपच्या अनुसूचित जनजाती मोर्चाचे राष्ट्रीय महामंत्री अशोक नेते यांनी 'गरीबों के सम्मान में, भाजपा मैदान मे' हा नारा प्रत्यक्षात उतरवत हा स्तुत्य उपक्रम राबविला. दिवाळीसारख्या सणाला गडचिरोली शहर परिसरातील फुटपाथवर राहणाऱ्या गरीब, भटक्या लोकांना हे साहित्य वाटण्यात आले.यावेळी प्रामुख्याने खासदार अशोक नेते, भाजपा जिल्हाध्यक्ष प्रशांत वाघरे, जिल्हा उपाध्यक्ष भारत खटी, माजी न.प.उपाध्यक्ष अनिल कुनघाडकर, शहराध्यक्ष मुक्तेश्वर काटवे,माजी जि.प अध्यक्ष समया पसुला,शहर महामंत्री विवेक बैस,उराडे ,माजी नगराध्यक्ष भुपेश कुळमेथे,युवा नेते हर्षल गेडाम,गणेश नेते,बोमनवार , शयाम वाढई,विनोद देवोजवार, दतु माकोडे,वच्छला मुंनघाटे, पुष्पा करकाडे, तसेच मोठ्या संख्येने लाभार्थी व भाजपा पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते.

# राजे अम्ब्रीशराव आत्राम यांनी केला डॉ.चेतन अलोने यांचा सत्कार

## पशुधन विकास अधिकारी म्हणून डॉ.चेतन अलोने यांची निवड

**गडचिरोली । प्रतिनिधी**

महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत पशुधन विकास अधिकारी या पदासाठी घेण्यात आलेल्या २०२२ च्या मुख्य परीक्षेच्या निकाल २० ऑक्टोबर रोजी जाहीर करण्यात आला.यात अहेरी येथील डॉ.चेतन अलोने यांनी नेत्रदीपक यश प्राप्त केले आहे. त्याबद्दल माजी पालकमंत्री राजे अम्ब्रिशराव आत्राम यांनी चेतन अलोने यांना शाल, श्रीफळ,पुष्पगुच्छ देऊन सत्कार केला. अहेरी क्षेत्रातील विद्यार्थी हे हळूहळू राज्यस्तरावर आपल्या गावाचे व जिल्ह्याचे नाव लौकीक करीत आहे हे आपल्यासाठी गौरवाची बाब असल्याचे राजे अम्ब्रीशराव आत्राम यांनी म्हंटले.सद्यास्थितीत अलोने हे पश्चिम बंगालच्या कोलकाता येथे




वेटेरिनिरी क्षेत्रातील देशात प्रसिद्ध असलेल्या प्रीमियम चिक फीड कंपनीत कार्यरत आहे.यावेळी सामाजिक कार्यकर्ते व भाजपा पदाधिकारी प्रामुख्याने उपस्थित होते.


**डॉ.चेतन अलोणे यांचे राजे अम्ब्रीशराव आत्राम यांच्या संस्थेत माध्यमिक शिक्षण धर्मराव कृषी विद्यालय, अहेरी येथे झाल्याने येथील सेवानिवृत्त प्राचार्य प्रमोद दोन्तुलवार तसेच राज्य आदर्श शिक्षक पुरस्कार प्राप्त शिक्षिका जयश्री खोंडे, यांनी सुद्धा डॉ.चेतन अलोणे यांचे सन्मान व अभिनंदन करून भेटवस्तु दिल्या.तसेच विविध स्तरावरुण डॉ.चेतन अलोणे यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव केल्या जात आहे.**


# ज्येष्ठ साहित्यिक डॉ.यशवंत मनोहर यांना यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

## यशवंतराव चव्हाण यांच्या पुण्यतिथीदिनी शरद पवार यांच्या हस्ते वितरण

















**चंद्रपूर (आशीष घुमे)–यशवंतराव चव्हाण सेंटरच्या वतीने दिला जाणारा 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्कार २०२३' नागपूर येथील ज्येष्ठ साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर यांना जाहीर झाला आहे. चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष खासदार सुप्रिया सुळे यांनी ही घोषणा केली. स्व. यशवंतराव चव्हाणांच्या पुण्यतिथीदिनी येत्या २५ नोव्हेंबर रोजी चव्हाण सेंटरचे अध्यक्ष शरद पवार यांच्या हस्ते हा पुरस्कार दिला जाणार आहे.**

चव्हाण सेंटरच्या वतीने दरवर्षी हा पुरस्कार दिला जातो. २ लाख रुपये रोख आणि मानपत्र असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. यावर्षी हा पुरस्कार ज्येष्ठ आंबेडकरवादी साहित्यिक डॉ. यशवंत मनोहर यांना जाहीर झाला आहे. मनोहर यांनी मराठी साहित्यात सातत्याने कसदार लेखन केले आहे. समाजातील नाकारलेल्या माणसांच्या जगण्यातला उद्वेग, आशय – अभिव्यक्ती मांडणारे संवेदनशील व्यक्तिमत्त्व म्हणून त्यांच्याकडे पाहिले जाते. त्यांच्या १९७७ साली प्रकाशित झालेल्या 'उत्थान गुंफा' या पहिल्याच कवितासंग्रहाची वाङ्मयजगतामध्ये विशेष दखल घेतली गेली. त्यांच्या साहित्यातून मानवतावादी दृष्टीकोन आणि संविधानातील मूल्यजागर स्पष्टपणे व्यक्त होताना दिसतो. हा पुरस्कार जाहीर झाल्याबद्दल चव्हाण सेंटरच्या कार्याध्यक्ष सुप्रिया सुळे यांनी डॉ. यशवंत मनोहर यांचे अभिनंदन केले आहे. स्व. चव्हाण साहेबांच्या पुण्यतिथीदिनी येत्या २५ नोव्हेंबर रोजी हा पुरस्कार वितरण सोहळा पार पडणार आहे. या सोहळ्याला नागरिकांनी उपस्थित रहावे, असे आवाहन सुळे यांनी केले आहे. चव्हाण सेंटरच्या वतीने दरवर्षी कृषी, औद्योगिक, सामाजिक, व्यवस्थापन, प्रशासन, विज्ञान, तंत्रज्ञान, ग्रामीण, आर्थिक विकास, मराठी साहित्य, संस्कृती, कला, क्रीडा अशा विविध क्षेत्रांमध्ये भरीव कामगिरी करणाऱ्या व्यक्तीला किंवा संस्थेला 'यशवंतराव चव्हाण राज्यस्तरीय पुरस्कार' देण्यात येतो.या पुरस्काराची सुरुवात १९९० पासून झाली. ज्येष्ठ साहित्यिक मधु मंगेश कर्णिक, ज्येष्ठ सामाजिक कार्यकर्ते बाबा आढाव, ज्येष्ठ कवयित्री स्व. शांता शेळके, ज्येष्ठ पत्रकार गोविंदराव तळवलकर, प्रा. एन.डी. पाटील, सिरम इन्स्टिट्युट ऑफ इंडिया आदी मान्यवर साहित्यिक आणि संस्थांना या पुरस्काराने यापूर्वी सन्मानित करण्यात आले आहे. त्यांना हा पुरस्कार प्रदान करण्यात आल्याने त्यांचे चाहते व विद्यार्थ्यांनी अभिनंदन केले आहे.

## 'लंडन'च्या रेड कार्पेटवर 'मोऱ्या' उर्फ जितेंद्र बर्डेचे भव्य स्वागत!

### ८ डिसेंबर २०२३ ला मोऱ्या महाराष्ट्रात



**मुंबई :** लंडन येथील सोहोवाला सिनेमा म्हणजेच 'कोर्ट हाऊस हॉटेल सिनेमा' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या लंडनच्या आयकॉनिक सिनेमा हॉलमध्ये मोरया या चित्रपटाच्या निमित्ताने पहिल्यांदाच एका मराठी चित्रपटाचा 'भव्य प्रीमियर शो' करण्यात आला आहे. यू के मधील महाराष्ट्रीय समुदायाने आयोजित केलेल्या या चित्रपटाच्या 'प्रीमियर शो'ची तिकिटे हातोहात संपली, ही आमच्यासाठी खूप अभिमानाची गोष्ट आहे असे आयोजकांच्या वतीने लंडन स्थित युनिक एअरएक्सप्रेस कुरिअरचे संचालक सिनेरसिक सचिन पाटील, कुलदीप शेखवात, तुषार जोगी, संतोष पारकर(बीजेपी), आबेडकरी विचाराचे प्रवीण करुणा यांनी व्यक्त केले आहे. या खास प्रीमियरसाठी मोऱ्या चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शक व प्रमुख अभिनेते जितेंद्र बर्डे हे खास उपस्थित होते.

आपल्या मराठी चित्रपट, नाटक, संगीत कलाकृतींचे लाखो चाहते जगभरात आहेत. अश्या कलाकृती पाहण्यासाठी ते आतुर असतात. विविध आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सवांमध्ये 'मोऱ्या' या मराठी चित्रपटाने लक्ष वेधले होते. त्यामुळे लंडन मधील रसिकांना हा चित्रपट पाहण्याची उत्सुकता होती. यू के मधील प्रीमियर शो पाहिल्यावर प्रेक्षक काही वेळ स्तब्ध होतो. चित्रपटाची कथा, मांडणी व सादरीकरण पाहून त्यांना गहिवरून आले होते. चित्रपटाचे लेखक, दिग्दर्शक, अभिनेते जितेंद्र बर्डे यांच्या कामाचे सर्वांनी तोंडभरून कौतुक केले. 'मोऱ्या' चित्रपटातील व्यक्तिरेखा मनात अस्वस्थता, लबिचल, काहूर निर्माण करते अशी प्रतिक्रियासर्वच प्रेक्षकांनी बोलून दाखविली. या चित्रपटाचे शोज् संपूर्ण युरोप देशामध्ये करण्याची मागणी त्यांच्याकडून करण्यात आली.एका सफाई कर्मचाऱ्यांची भावस्पर्शी कथा 'मोऱ्या' या चित्रपटात रेखाटण्यात आली असून ती साकारण्यासाठी अभिनेता जितेंद्र बर्डे यांनी विशेष मेहनत घेतली आहे. त्यांचा नैसर्गिक सहज – संयमी अभिनय रसिकांच्या मनात घर करीत असून रसिकांसोबत त्यांची नाळ जोडली जात आहे. खास या शोसाठी उपस्थित असलेले जितेंद्र बर्डे हा सर्व अनुभव पाहून भारावून गेले होते. ते म्हणाले, आपण जन्माला घातलेल्या कलाकृतीला प्रेक्षक आपलं म्हणतात, आणि तो विचार, ती कलाकृती स्वतः सोबत घेऊन जातात, हा विलक्षण अनुभव मी इथे अनुभवाला आहे. माझा हा पहिला चित्रपट आहे, त्यासाठी मी आणि माझ्या टीमने केलेले सर्व कष्ट सार्थकी लागले आहेत, विशेष म्हणजे धुळे जिल्ह्यातील 'पिंपळनेर ते लंडन' हा माझा प्रवासही 'मोऱ्या'मुळेच घडला आहे.'मोऱ्या'चा टीझर 'कान महोत्सवात दाखवण्यात आला होता. एलएचआयएफएफ बार्सिलोना आंतरराष्ट्रीय चित्रपट महोत्सव, खजुराहो आंतरराष्ट्रीय सिनेमहोत्सव, झारखंड आंतरराष्ट्रीय सिनेमहोत्सव–२०२२, पेनझान्स आंतरराष्ट्रीय सिनेमहोत्सव, अयोध्या फिल्म फेस्टिव्हल, लेक सिटी इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल, बॉलिवूड इंटरनॅशनल फिल्म फेस्टिव्हल या चित्रपट महोत्सवांत या सिनेमाला 'उत्कृष्ट चित्रपटा'चा बहुमान मिळाला आहे. तसंच यापैकी काही महोत्सवांमध्ये सर्वोत्कृष्ट अभिनेता, सर्वोत्कृष्ट बालकलाकार, सर्वोत्कृष्ट कथा असे पुरस्कारही या सिनेमानं पटकावले आहेत. जितेंद्र बर्डेची ही पहिलीच कलाकृती आहे. या निर्मितीसाठी निर्माती तृप्ती कुलकर्णी, राजेश अहिवले, सहनिर्माते प्रेरणा धजेकर, पूनम नागपूरकर, मंदार मांडके, राहुल रोकडे, सचिन पाटील यांची खंबीर साथ लाभली आहे.'टॉर्टुगा मोशन पिक्चर्स' निर्मित 'मोऱ्या'मध्ये उमेश जगताप, संजय भदाणे, धनश्री पाटील, राहुल रोकडे, सुरज अहिवळे, रुद्रम बर्डे, कुणाल पुणेकर, शिवाजी गायकवाड, दीपक जाधव, विजय चौधरी, अविनाश पोळ, रुपाली गायके आणि जितेंद्र पुंडलिक बर्डे यांच्या प्रमुख भूमिका आहेत. या चित्रपटात उमेश जगताप, संजय भदाणे, धनश्री पाटील, रुद्रम बर्डे, कुणाल पुणेकर आणि शीर्षक भूमिकेत जितेंद्र बर्डे यांनी काम केले आहे. सफाई कामगार ते पिंपळनेरचा सरपंच हा 'मोऱ्या' उर्फ सीताराम जेधेचा थक्क करणारा जीवनप्रवास नेमका आहे तरी कसा हे दाखविण्यासाठी येत्या ८ डिसेंबर २०२३ ला मोऱ्या महाराष्ट्रातील आपल्या जवळच्या चित्रपटगृहांमध्ये प्रदर्शित होणार आहे.

## सरकारने शब्द दिल्यानंतर दौरे करणे कितपत योग्य ?:जरागेंनी उपोषणातून कमावले, ते भाषणातून गमावू नये – दीपक केसरकर

**मुंबई–**सरकारने शब्द दिल्यानंतर दौरे करणे कितपत योग्य? मनोज जरागेंनी उपोषणातून कमावले, ते भाषणातून गमावू नये, असा सल्ला शिंदे गटाचे मंत्री दीपक केसरकर यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांना दिला आहे.दरम्यान दीपक केसरकर पुढे बोलताना म्हणाले की, कुठल्याही परिस्थितीत महाराष्ट्राचे सामाजिक ऐक्य टिकले पाहिजे. दोन्हीकडून हे तातडीने थांबले पाहिजे. छत्रपती शिवाजी महाराजांच्या पायाला डोके लावून मुख्यमंत्र्यांनी आरक्षणाचा शब्द दिला आहे. ओबीसींच्या आरक्षणाला धक्का न लावता मराठा आरक्षण देण्याची सरकारची भूमिका आहे. आरक्षणावरून राज्यातील राजकारण तापले आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे यांनी राज्यात मराठा आरक्षणासाठी दौरे सुरु केले आहेत. या दौऱ्यातील सभेत जरांगे यांच्याकडून सरकारवर टीका केली जात आहे. मराठा आरक्षणाच्या प्रश्नासाठी सरकारने शब्द दिला असताना जरांगे यांच्याकडून सरकारवर टीका केली जात आहे. यावरून



मंत्री दीपक केसरकर यांनी मनोज जरांगे यांनी सल्ला दिला आहेदीपक केसरकरा म्हणाले की, आंदोलन जिवंत राहण्यासाठी काहीतरी करणे चुकीचे आहे. आरक्षण देण्याची जबाबदारी सरकारची आहे. कोणत्याही समाजाने एकमेकांविरोधात वक्तव्य करु नये. सरकारची भूमिका ठाम आहे. कुणीही मनात संशय बाळगू नका. श्रद्धा आणि सबुरी ठेवा, असे केसरकरांनी म्हटलं आहे. सर्व विभागातून मराठा समाजाचा इम्पेरिकल डाटा गोळा करण्याचे काम सुरू आहे. डाटा गोळा करण्यासाठी सरकारला सहकार्य करावे. रेकॉर्ड तयार झाल्यावरच कायद्याच्या कसोटीवर टिकणारे आरक्षण मिळेल, असेही त्यांनी सांगितले.संभाजीराजेंनी काल माझ्यावर २ समाजांत वितुष्ट निर्माण करण्याचा आरोप केला. त्यांनी माझी मंत्रिमंडळातून हकालपट्टी करण्याची मागणी केली. आम्ही त्यांचा आदर करतो. कारण, आमच्या हृदयात असणाऱ्या छत्रपती शाहू महाराजांनी मागासवर्गीयांच्या उत्थानाचे काम केले. संभाजीराजे त्यांच्या गादीवर बसलेत. ते एका समाजाचे नाहीत. ते राज्याती सर्व समाजाचे आहेत. पण त्यानंतरही ते एका समाजाची बाजू घेऊन कसे काय बोलतात?एकतर संभाजीराजे यांनी या वादात पडण्याची गरजच नव्हती आणि पडले तर त्यांनी सर्वांचे अधिकार शाबूत ठेवा, कुणावरही अन्याय करू नका अशी भूमिका घेण्याची गरज होती. आम्हाला त्यांच्याकडून हीच अपेक्षा होती, असे छगन भुजबळ म्हणाले.

## छगन भुजबळांना सभा घ्याव्या लागताहेत, कॅबिनेटमध्ये त्यांचे ऐकले जात नाही–पवार

**मुंबई–**छगन भुजबळ हे मंत्री असताना त्यांना सभा घ्याव्या लागत आहेत, याचाच अर्थ या सरकारमध्ये मंत्र्यांच ऐकले जात नाही हे स्पष्ट होते. जर मंत्र्यांचे चालत नसेल तर सामान्य लोकांचे या सरकारमध्ये काय चालणार असे म्हणत राष्ट्रवादीचे आमदार रोहित पवार यांनी छगन भुजबळ यांच्या टीकेला प्रत्युत्तर दिले आहे.छगन भुजबळ यांनी राजेश टोपे आणि रोहित पवार यांच्यावर टीका केली होती. ते म्हणाले की, मनोज जरांगे यांच्या आंदोलनावेळी जो लाठीचार्ज झाला त्यानंतर मनोज जरांगे हे घरात जाऊन बसले होते. मात्र राजेश टोपे आणि रोहित पवार यांनी त्यांना घरातून आणून पुन्हा उपोषण स्थळी बसवले आणि त्यांना सांगितले की शरद पवार साहेब आपल्या भेटीला येणार आहेत.रोहित पवार म्हणाले की, मराठा आणि ओबीसी आरक्षणाबाबत चर्चा करून मार्ग



काढण्याची भूमिका सर्वांनी घेतली पाहिजे. केंद्र सरकारकडे जाऊन ५० टक्क्यांच्या पुढे आरक्षण कसे घेता येईल यासाठी प्रयत्न केले पाहिजे. छगन भुजबळांच्या या टीकेनंतर आमदार रोहित पवारांनी प्रतिक्रिया दिली आहे. ते म्हणाले की, भुजबळ मंत्री असून त्यांना सभा घ्याव्या लागत आहेत, याचा अर्थ त्यांचे कॅबिनेटमध्ये ऐकले जात नाही. भुजबळांच्या या टीकेला मी योग्य वेळ आल्यानंतर उत्तर देईन.छगन भुजबळ म्हणाले की, आमचे राजेश टोपे साहेब आणि छोटे साहेब रोहित पवार यांनी त्याला (जरांगे) पहाटे तीन वाजता परत आणून बसवले. त्याला सांगितले, शरद पवारसाहेब येणार आहेत. शरद पवारांना लाठीचार्ज का झाला, पोलिसांवर हल्ले कसे झाले हे सांगितले नाही. मनोज जरांगेंच्या आंदोलनावेळी ७० पोलिसांवर हल्ले झाले. त्यानंतर पोलिसांनी लाठीचार्ज केला. पण महाराष्ट्रासमोर चुकीचे चित्र गेले. होममिनिस्टरच माफी मागू लागला,गुन्हे मागे घेऊ म्हणू लागला, त्यामुळे पोलिसांचे मनोबल खचले आहे.

### पूर्ण टूर्नामेंटमध्ये खेळलो तसेच खेळू–रोहित शमा

**अहमदाबाद–**टीम इंडियाचा कर्णधार रोहित शर्मा म्हणाला– आम्ही या स्पर्धेत ज्या प्रकारे खेळत आलो आहोत त्याच पद्धतीने अंतिम सामना खेळू. आमच्या दृष्टिकोनात कोणताही बदल होणार नाही.आम्ही अद्याप अंतिम अकराचा निर्णय घेतलेला नाही. आम्ही नाणेफेकीच्या वेळी खेळपट्टीच्या परिस्थितीनुसार आमची ताकद काय आहे आणि ऑस्ट्रेलियाची कमकुवतता काय असू शकते हे ठरवू.रोहितने शनिवारी सामनापूर्व पत्रकार परिषदेत या गोष्टी सांगितल्या. रविवारी अहमदाबादच्या नरेंद्र मोदी स्टेडियमवर भारत आणि ऑस्ट्रेलिया यांच्यात क्रिकेट विश्वचषकाचा अंतिम सामना रंगणार आहे.भारतीय कर्णधार म्हणाला– वर्ल्ड कपची तयारी दोन वर्षांपूर्वी सुरू झाली होती. आम्ही सर्व खेळाडूंच्या भूमिकांमध्ये स्पष्टता ठेवली आणि त्या भूमिकांसाठी योग्य खेळाडूंची निवड केली. या विश्वचषकात आमच्या गोलंदाजांनी अप्रतिम कामगिरी केली आहे.कर्णधार म्हणून प्रशिक्षक राहुल द्रविड यांच्याशी खूप चर्चा केली. त्यानंतर प्रत्येक भूमिकेसाठी योग्य खेळाडूंची निवड करून त्यांना संधी देण्यात आली. आता आम्हाला आमच्या भूमिका माहित आहेत.एका प्रश्नावर रोहित म्हणाला की ही खूप मोठी संधी आहे यात शंका नाही. व्यावसायिक खेळाडूंसाठी हे आव्हानात्मक आहे. आम्ही जे काही स्वप्न पाहिले आहे, आम्ही तिथे आहोत. आमच्या कारकिर्दीतील ही सर्वात मोठी संधी आहे आणि आम्हाला आमची रणनीती अधिक चांगल्या पद्धतीने स्वीकारायची आहे. विश्वचषक फायनलमध्ये खेळण्याची संधी दररोज मिळतेच असे नाही. मी एकदिवसीय विश्वचषक पाहत मोठा झालो आहे, त्यामुळे माझ्यासाठी ही सर्वात मोठी संधी असेल.टॉसवर रोहित म्हणाला की खेळपट्टीवर काही गवत आहे. भारत–पाकिस्तानची विकेट खूपच कोरडी होती. माझ्या समजुतीनुसार, विकेट संथ असणार आहे. उद्या खेळपट्टी बघून त्याचे मूल्यांकन करू. तापमानातही किंचित घट झाली आहे. दव खेळाला कशी मदत करेल हे मला माहीत नाही. नाणेफेक फार मोठी भूमिका बजावेल असे मला वाटत नाही.ऑस्ट्रेलियाने ८ पैकी ८ सामने जिंकले आहेत. ते चांगले क्रिकेट खेळले आहेत आणि दोन्ही संघ अंतिम फेरीत पोहोचण्यास पात्र आहेत. ऑस्ट्रेलिया काय करू शकतो हे आम्हाला माहीत आहे. आम्हाला काय करायचे आहे यावर लक्ष केंद्रित करायचे आहे.

# महाराष्ट्रासाठी लढताना माझ्यावर गुन्हे दाखल होत असतील तर बाळासाहेबांना अभिमान वाटला असता – आदित्य ठाकरे

**मुंबई–**आम्ही लोकांसाठी लढतोय म्हणून गुन्हे दाखल केले, असा आरोप ठाकरे गटाचे वरळीचे आमदार आदित्य ठाकरे यांनी केला आहे..तसेच दोन्ही पालकमंत्र्यांवर गुन्हे दाखल करण्याची मागणी त्यांनी केली. दरम्यान डिलाईल रोड उड्डाणपुलाचं बेकायदेशीररित्या उद्घाटन केल्याप्रकरणी आदित्य ठाकरे यांच्यासह सचिन अहिर आणि सुनील शिंदे यांच्यावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. त्यावर आदित्य ठाकरेंनी ही प्रतिक्रिया दिली. दरम्यान आदित्य ठाकरे पुढे बोलताना म्हणाले की, मुंबईकरांसाठी लढतोय म्हणून गुन्हा दाखल झाला आहे. उद्घाटनासाठी वेळ नसल्यामुळे डिलाईरोडचा पुल बंद ठेवण्यात आला होता. मुंबईकरांसाठी लढत असताना गुन्हा दाखल होत असेल तर माझ्या आजोबांना अभिमान वाटत असेल. बेकायदेशीर बांधकामे करणाऱ्या बिल्डरवर गुन्हे दाखल होत नाहीत. वेळेत काम पूर्ण न केलेल्यांवर गुन्हे दाखल करा. भ्रष्टाचार आम्ही समोर आणले. पालकमंत्र्यांचा राजीनामा घ्या. स्ट्रीट फर्निचरचा घोटाळा आम्ही समोर आणल्यानंतरही २२ कोटींचे कॉन्ट्रॅक्ट देण्याचा घाट घातला. मुख्यमंत्र्यांचे काहीच दिवस राहिले आहेत त्यामुळे राज्यपालांनी लक्ष घालावे.आदित्य ठाकरे म्हणाले की, परवा रात्री आम्ही तिथे गेलो तेव्हा तिथे काही बॅरिकेड्स होते आणि ते आम्ही बाजुला केले. आम्ही पुढे चालत गेलो आणि रस्ता खुला झाल्याचे सांगितले. डिलाईन रोडची ही दुसरी लेन १०-१५ दिवसांपासून तयार होती. रंगरंगोटी झालेली, लेन मार्किंगही झालेली. बीएमसीचे काही पॅरामिटर्स असल्याने लोड टेस्टिंगसाठीही आम्ही थांबलेलो. हे सगळे झाल्यानंतरही मुख्यमंत्र्यांना वेळ मिळत नाही म्हणून बीएमसी थांबलेली. म्हणून आम्ही अभिमानाने उद्घाटन केले आहे, असेही आदित्य ठाकरे म्हणाले.आदित्य ठाकरे म्हणाले की, जे गुन्हे दाखल



केले त्यावर आपली एकच प्रतिक्रिया असून मुंबईकरांसाठी आणि महाराष्ट्रासाठी लढत असताना जर माझ्यावर गुन्हे दाखल होत असतील तर माझ्या आजोबांना माझा अभिमान वाटला असता, असेही आदित्य ठाकरे म्हणाले. आम्ही मुंबई लुटून देणार नाही. महाराष्ट्र झुकू देणार नाही. हे जे सरकार चालले आहे ते बुलेट ट्रेनमधून येणारे-जाणारे सरकार आहे. बुलेट ट्रेन झाल्या-झाल्या पलिकडे, जिथे वर्ल्डकपची फायनल होतेय तिथे जाऊन बसतील, असा टोला आदित्य ठाकरे यांनी लगावला.आदित्य ठाकरे म्हणाले की, पहिले गुन्हे बिल्डर पालकमंत्री आणि बीएमसीमध्ये जाऊन अतिक्रमन करून बसलेले आहेत त्यांच्यावर झाले पाहिलेत. प्रशासकांना प्रमोशन घेऊन, बदली करून दिल्लीला जायचं आहे. पण आम्ही गेल्या वर्षभरात त्यांचा भ्रष्टाचार समोर आणला. रस्त्याचो घोटाळा, सॅनिटरी पॅडचा घोटाळा, स्ट्रिट फर्निचरचा घोटाळआ किंवा सौंदर्यीकरणाचा घोटाळा असेल, त्यावर त्यांची सही आहे. अशा व्यक्तीला प्रमोशन मिळणार का? दुसऱ्या खात्यात घेतले जाणार का? असा सवालही आदित्य ठाकरे यांनी केला.आदित्य ठाकरे म्हणाले की, आम्ही आवाज उठवल्यानंतर एका कॉन्ट्रॅक्टरला बाद करावे लागले. आम्ही रस्ता तयार झाल्यावर लोकांसाठी खुला करून देतो तर आमच्यावर गुन्हे दाखल होतात, पण त्या कॉन्ट्रॅक्टरवर गुन्हा दाखल झालेला नाही किंवा त्याचे ब्लॅकलिस्टिंगही झालेले नाही. हे सरकार बिल्डर आणि कॉन्ट्रॅक्टरचे आहे, असा हल्लाबोल आदित्य ठाकरे यांनी केला. आदित्य ठाकरे म्हणाले की,, सॅनिटरी पॅड वेंडिंग मशीनचे काम थांबलेले आहे, पण तरीही सरकारला कॉन्ट्रॅक्टरला पैसे द्याचे आहेत. स्ट्रिट फर्निचरचा घोटाळा समोर आणल्यानंतर ते कामही थांबलेय, पण यांना २२ कोटी कॉन्ट्रॅक्टला द्यायचे. सत्यमेव जयते सोबत उभे राहतात त्यांच्यावर गुन्हे दाखल होतात, पण सत्तामेव जयते किंवा कॉन्ट्रॅक्टर जयते म्हणतात त्यांच्यावर गुन्हे दाखल केले जात नाही, असा घणाघात आदित्य ठाकरे यांनी केला.

# ओबीसांचा एल्गार अभी बाकी है-प्रकाश शेंडगे

**मुंबई–**जालना जिल्ह्यातील अंबडमध्ये आरक्षण वाचवण्यासाठी ओबीसीची महाएल्गार सभा पार पडली. ही एतिहासिक सभा असली तरी ओबीसांचा एल्गार अभी बाकी है, असे म्हणत आरक्षणाला धक्का लावला तर ओबीसी समाज राज्य सरकारला खाली खेचणार, असा इशारा ओबीसी नेते प्रकाश शेंडगे यांनी दिला आहे.दरम्यान प्रकाश शेंडगे पुढे बोलताना म्हणाले की, आरक्षणाला धक्का लावाल तर सराकर पाडण्याची ताकद ओबीसीमध्ये आहे.अंबडमधून मराठा समाजाने आरक्षणाची लढाई सुरू केला आहे. त्यामुळे ओबीसींनीही तेथूनच आरक्षण बचावचा एल्गार केला. ओबीसी आरक्षण संरक्षणासाठी पक्षाचे जोडे बाजूला ठेऊन सर्वपक्षीय नेते एकत्र आले. त्यामुळे राज्यातील ओबीसींची संख्या मोठी असल्याचे



स्पष्ट होत आहे.प्रकाश शेंडगे म्हणाले की, मराठा समाजाच्या दबवाला बळी पडून सरकारने कुणबी प्रमाणपत्र देण्याचा सपाटाच लावला होता. रात्री-बेरात्री जीआर निघू लागले होते. मराठा समाजाच्या दबावाला बळी पडून सरकार आपल्या ताटातील घास हिरावण्याची शक्यता होती. परिणामी समाजाच्या तोंडचे पाणी पळाले होते. मात्र एल्गारमध्ये सर्व नेत्यांनी घेतलेल्या आक्रमक पवित्र्यामुळे लोकांनी सुटकेचा निश्वास सोडला आहे. यापुढे राज्यात सामाजिक न्याय नाकारण्याची कुठल्याच सरकारमध्ये होणार नाही.प्रकाश शेंडगे म्हणाले की, अंबडमधील सभा अभूतपूर्व, एतिहासिक होती. मात्र ही सभा फक्त झॉकी है, ओबीसी का एल्गार अभी बाकी है,' असे म्हणत, 'हिंगोलीत २६ नोव्हेंबर रोजी होणारी सभा अंबडपेक्षा मोठी असेल,' असा दावा शेंडगेंनी केला. तेथेही सर्वपक्षीय नेते एकत्र येणार आहे. कुठल्याही पक्षाने ओबीसी आरक्षण फोडण्याचा प्रयत्न केला तर त्याचे परिणाम भोगावे लागतील. हे सरकार खाली खेचल्याशिवाय राहणार नाही, त्याची चुणूकच आता राज्याने पाहिली आहे, असे वक्तव्यही त्यांनी केले.

# विजय वडेट्टीवार शरद पवारांच्या भेटीला: सत्ताधारी लोकांची बुद्धी भ्रष्ट झाली–वडेट्टीवार

**पुणे–**सत्ताधारी लोकांची बुद्धी भ्रष्ट झाली आहे. सरकारचे अधपतन व्हायला सुरुवात झाली आहे, असा टोला विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार यांनी राज्य सरकारला लगावला आहे. वडेट्टीवार पुढे बोलताना म्हणाले की, तोंड पाहून दुष्काळ जाहीर करण्याची प्रथा महाराष्ट्रात सुरू झाली आहे, असा टोला त्यांनी राज्य सरकारला लगापवला आहे. या सर्व गोष्टीचा केवळ सत्तेतल्या लोकांनी फायदा घ्यायचा असे सध्या सुरु आहे, असा आरोप त्यांनी केला आहे.दरम्यान विरोधी पक्षनेते विजय वडेट्टीवार म्हणाले की, शरद पवार यांना भेटलो, आमची राज्यातील राजकीय परिस्थितीवर चर्चा झाली. आमच्यामध्ये काय चर्चा झाली हे माध्यमांपुढे उघड करणे म्हणजे आमच्या आपापसात भंग होईल, असे म्हणत त्यांनी प्रतिक्रिया दिली आहे. विजय वडेट्टीवार हे आज बारामतीत व्हाईस ऑफ मीडिया यांच्या वतीने आयोजित केलेल्या पत्रकारांच्या राज्यव्यापी अधिवेशन उद्घाटन समारंभासाठी दाखल झाले



आहेत. सा कार्यक्रमाआधी त्यांनी राष्ट्रवादीचे अध्यक्ष शरद पवार यांच्या गोविंद बाग या निवासस्थानी शरद पवार यांची भेट घेतली आहे. तर विजय वडेट्टीवार हे धनगर आरक्षण उपोषणकर्त्यासोबतही चर्चा करणार असल्याची माहिती आहे.विजय वडेट्टीवार म्हणाले की, सत्ताधारी लोकांची बुद्धी भ्रष्ट झाली आहे. सरकारचे अधपतन व्हायला सुरुवात झाली आहे, असा टोला त्यांनी शिंदे सरकारला लगावसला आहे. तर तोंड पाहून दुष्काळ जाहीर करण्याची प्रथा महाराष्ट्रात सुरू झाली आहे, असा टोला त्यांनी राज्य सरकारला लगापवला आहे. या सर्व गोष्टीचा केवळ सत्तेतल्या लोकांनी फायदा घ्यायचा असे सध्या सुरु आहे, असा आरोप त्यांनी केला आहे. विजय वडेट्टीवार म्हणाले की, राज्यात जर असेच वातावरण राहिले तर दोन समाजात दरी निर्माण होईल, आणि महाराष्ट्राला कलंक लागेल असे कोणीही करु नये. हक्क मागण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे, देण्याचा अधिकार चौकटीत बसवून शासनाला आहे शासनाने तो पूर्ण करावा, असेही त्यांनी म्हटले आहे. तर संभाजीराजे यांच्यावर विचारलेल्या प्रश्नांवर त्यांनी बोलणे टाळले आहे. आरक्षण देणे हा सरकारचा प्रश्न आहे, सत्ताधारी आपली पथ राखण्यासाठी लढत आहेत. ज्या नोंदी मिळल्या आहेत, त्यांना ओबीसी मध्ये घेणार का? जात निहाय जनगणना करावी आणि त्यांचा वाटा त्यांना द्यावा, असेही त्यांनी म्हटले आहे.

# मेरिटवर आरक्षण द्या:कुणावरही अन्याय होणार नाही याची काळजी घ्या,जातनिहाय जनगणना करा-उदयनराजे भोसले

**सातारा–**जातीनिहाय जनगणना करा, कुणावर अन्याय होऊ देऊ नका, असे म्हणतानाच खासदार उदयनराजे भोसले यांनी मेरिटवर आधारित आरक्षण द्यायला हवे, अशी मागणी केली आहे. साताऱ्यात मनोज जरांगे यांनी त्यांची भेट घेतल्यानंतर माध्यमांशी संवाद साधत असताना ही मागणी केली आहे.मी मनोज जरांगे यांना इतकेच सांगितले आहे की, तुझे कुटुंब आहे त्यांच्यासाठी तू जगला पाहिजे. शिवाजी महाराजांनी त्यां काळात काही भेदभाव केला नाही, त्यांनी कुणाला अंतर दिले नाही. सर्व लोकांनी विचार करायला हवे की एक व्यक्ती हे करतोय कारण त्याच्यावर अन्याय झाला आहे. मी कुठल्या जातीचे समर्थन करत नाही. मराठा आरक्षणाच्य मुद्द्यावर बोलताना उदयनराजे म्हणाले की, तुम्ही जनगणना करा आणि कुणावर अन्याय करु नका. जे कोण आहेत त्यांना तुम्ही आरक्षण द्यायला पाहिजे, मी मराठा म्हणून बोलत नाही, पण मराठा समाजाला आरक्षण द्यायला पाहिजे. आरक्षण हे मेरीटवर आरक्षण दिले पाहिजे, असे म्हणत जातीजातीत कुणी तेढ निर्माण केली यात मला पडायचे नाही ते तुम्ही शोधा असे म्हणत खासदार उदयनराजे भोसले यांनी आपली भूमिका स्पष्ट केली आहे.खासदार उदयनराजे भोसले म्हणाले की, सर्वांनी मनातून अंतकरणातून विचार करायला हवा. जातीजातीत तेढ निर्माण करू नका. काय बोलायचं? सर्वांनीच विचार करण्याची वेळ आली आहे. या देशाचे तुकडे करू नका. नाही तर या



देशाची खऱ्या अर्थाने वाट लागेल, अशी हात जोडून उदयनराजे यांनी कळकळीची विनंती केली.

बराचवेळ हातजोडून उदयनराजे कळकळीची विनंती करत होते.भुजबळ यांच्या या विधानानंतर जरांगे पाटील यांनीही पलटवार केला आहे. मनोज जरांगे पाटील यांनी त्यांना जशास तसं उत्तर दिलं आहे. छगन भुजबळ यांचं वय झालंय. त्यामुळे ते काहीही बरळत आहेत. त्यांना मुख्यमंत्री व्हायचं आहे, असा गौप्यस्फोट मनोज जरांगे पाटील यांनी केला आहे. कोल्हापूर येथे त्यांनी हा गौप्यस्फोट केला. समाजासमाजात भांडणे लावून त्यांना दंगली घडवायच्या आहेत. मात्र, मराठा समाज ते कदापि होऊ देणार नाही. सरकारने त्यांना रोखावे, अन्यथा जशास तसे उत्तर द्यावे लागेल, असा इशारा मनोज जरांगे-पाटील यांनी आज मंत्री छगन भुजबळ आणि सरकारला येथे दिला. मराठ्यांचे आरक्षण १८०५ पासून होते. जर मराठ्यांचे पुरावे होते तर ७० वर्षे कोणी लपवून ठेवले? याचे आता उत्तर पाहिजे. ज्यावेळी आरक्षणासाठी समिती नेमली. त्या-त्यावेळी मराठ्यांना आरक्षण नाही, असे सांगण्यात आले.मनोज जरांगे पाटील म्हणाले की, आता पुरावा सापडू लागल्यावर मराठ्यांचे आरक्षण दबावामुळे लपवून ठेवले हे स्पष्ट झाले आहे. ते का लपवून ठेवले याचे उत्तर मिळाल्याशिवाय आता गप्प बसणार नाही. आपल्या मायबापाने काबाडकष्ट करुन पोरांना शिकवले. परंतु ना बापाचे, ना पोराचे स्वप्न पूर्ण झाले. आरक्षण नसल्याने स्वप्नांची राखरांगोळी झाली, आयुष्य उद्ध्वस्त झाले

# आम्ही देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व मानतो:ते जो महाराष्ट्र भाजपसाठी निर्णय घेतील तो बंधनकारक - उदय सामंत

**रत्नागिरी–**जिल्ह्यात मी भाजप पदाधिकाऱ्यांच्या संपर्कात आहे. आम्ही देवेंद्र फडणवीस यांचे नेतृत्व मानतो. ते भाजपसाठी महाराष्ट्रात जो निर्णय घेतील, तो आम्हाला बंधनकारक आहे. भाजपच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांना जो निधी पाहिजे, तो देण्याचा प्रयत्न आहे. समित्यांवरही भाजपच्या पदाधिकाऱ्यांना घेतले आहे. पालकमंत्री म्हणून भाजपाला बरोबर घेऊन जाण्याचा प्रयत्न करत आहे, असे सांगतानाच शिंदे गटाचे मंत्री उदय सामंत यांनी भाजप आणि शिवसेनेत सर्वकाही आलबेल आहे हे दाखविण्याचा प्रयत्न केला आहे.दरम्यान मंत्री उदय सामंत म्हणाले की, रत्नागिरीत भाजपच्या सर्व पदाधिकारी व नेत्यांच्या मी संपर्कात आहे. त्यांच्याशी विकासकामांबाबतही चर्चा करत आहे. अगदी ठाण्यापासून अनेक पदाधिकारी संपर्कात आहेत. रत्नागिरीचे संपर्कमंत्री व सार्वजनिक बांधकाम मंत्री रवींद्र चव्हाण यांच्याशीही चर्चा करत आहोत.उदय सामंत म्हणाले की, माजी आमदार व भाजपचे विधानसभा क्षेत्राचे अध्यक्ष बाळ माने यांचाही मतदार संघात मोठा आवाका आहे. एक चांगली संस्था ते चालवतात. काय समज-गैरसमज असतात ते दूर होत असतात. १९९९ पासून आपण या मतदार संघात कार्यरत आहोत. पहिल्या चार वर्षात २००४ पर्यंत घेतलेली मेहनत आपण सर्वांनीच पाहिली आहे. त्यानंतर मी सातत्याने जिंकत



आहे. आपला संपर्क नेहमीच तळागाळातील जनतेशी असतो. त्यामुळे कोण काय बोलतो याकडे मी लक्ष देत नाही. मतदारांच्या मनात जे आहे तेच होणार आहे. ज्यांना कुणाला जे काय करायचे ते करावे.उदय सामंत म्हणाले की, सर्वच पक्षांचे पदाधिकारी आपल्याला भेटतात. कुणी समोरून भेटायला येते, कुणी पाठच्या दाराने भेटते, कुणी मंत्रालयात भेटायला येतात; पण आपण कुणाची नावे उघड करू इच्छित नाही. कुणाची कामे झाल्यावर आपल्याला शिव्या द्यायच्या असतील तर त्यांनी खुशाल द्याव्यात, असाही टोला त्यांनी हाणला; परंतु आपण काम केल्याचे बोलून दाखवायचे नाही. त्याला नीती हेच उत्तर आहे.

# ओबीसी समाजाच्या न्याय हक्कांसाठी ३५ वर्ष लढलो : यापुढेही लढणार

## मराठा समाजाला आरक्षण मिळावे हीच माझी भूमिका– भुजबळ

**नाशिक–**देशात ५४ टक्क्यांहून अधिक असलेल्या ओबीसी समाजाच्या न्याय हक्कासाठी गेली ३५ वर्ष लढत आलो आहे. यापुढील काळातही कितीही संकटे आली तरी लढत राहणार असून ओबीसी समाजावर जर अन्याय होत असेल तर आम्ही गप्प राहणार नाही, असे प्रतिपादन राज्याचे अन्न, नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांनी केले.राज्याचे अन्न,नागरी पुरवठा व ग्राहक संरक्षण मंत्री छगन भुजबळ यांच्या हस्ते आज मोडाळे ता.इगतपुरी येथे विविध विकास कामांचे लोकार्पण व भूमिपूजन करण्यात आले. तसेच नवनिर्वाचित ग्रामपंचायत सरपंच व सदस्यांचा सत्कार त्यांच्या हस्ते करण्यात आला. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. राष्ट्रवादी काँग्रेसचे प्रदेश सरचिटणीस गोरख बोडके यांनी या कार्यक्रमाचे आयोजन केले होते.मंत्री छगन भुजबळ पुढे म्हणाले की, मराठा समाजाला आरक्षण मिळावे हीच माझी भूमिका आहे, पण मराठा समाजाला वेगळे आरक्षण द्यायला हवे ही मागणी आहे. कारण जबरदस्तीने कोणाला ओबीसी मध्ये घुसवले तर परत कोर्ट कचेऱ्या होतील आणि हा प्रश्न तसाच पडून राहील. आरक्षण हा गरिबी हटावचा कार्यक्रम नाही. समाजात जे दबलेले पिचलेले आहेत जे मागास आहे त्यांना समाजाच्या मुख्य प्रवाहात



आणण्यासाठी विविध संधी उपलब्ध करून देण्यासाठी हा उपक्रम आहे. आजही एससी, एसटी प्रवर्गाला आरक्षण देऊन इतके वर्ष झाले तरी देखील आजही मोठा समाज गरिबीच्या छायेत असल्याचे त्यांनी सांगितले.भुजबळ म्हणाले की, ओबीसी समाजाला मिळालेले आरक्षण हे सहजासहजी मिळालेले आरक्षण नाही. यासाठी अनेक वर्ष लागली अनेक आयोग झाले. त्यानंतर सर्वोच्च न्यायालयाच्या न्यायमुर्तीच्या खंडपिठाने हे आरक्षण लागू करण्याबाबत निर्णय दिला. आज ओबीसी समाजात पावणे चारशे जाती झाल्या आहे. त्यात ओबीसीत समावेश होण्यासाठी काही लोक अडून बसले, जाळपोळ झाली मग आम्ही कसे शांत बसणार असा सवाल त्यांनी उपस्थित केला.भुजबळ म्हणाले की, आंदोलन स्थळी पोलिसांवर मोठी दगडफेक झाली. परंतु मिडिया समोर एक बाजू आली की पोलीस हल्ला करता आहे. पण त्या अगोदर काय झाले, प्रचंड दगडांचा मारा त्यावेळी झाला. महिला पोलिसांना मारले गेले. पोलिसांना मारले गेले म्हणून त्यांनी काठ्या चालवल्या त्यात ७० पोलिस जखमी झाले. त्यानंतर बीड मध्ये वाटेल त्याची घरे जाळली गेली आणि पोलिसांवर कारवाई झाली. हे जे झाले ते सत्य समोर आले असते तर त्यांना सहनभुती मिळाली नसती. महिला पोलिसांना विचारा नक्की काय झाले ते असा सवाल त्यांनी केला.भुजबळ म्हणाले की, कुणाला काय मागायचे ते शांततेने मागायला हवे. तुम्ही तुमच्यासाठी पुढे आला मग मी का ओबीसीसाठी पुढे येऊ नको असा सवाल त्यांनी उपस्थित केला. मला मंत्री पद, आमदारकीची फिकीर नाही. गावोगावी लावलेल्या गावबंदीच्या फलकांवर बोलतांना ते म्हणाले की, या देशात कोणीही कुठेही जाऊ शकतो त्याला विरोध करू नका, या देशात संविधान आहे. पोलिसांनी आणि इतर यंत्रणांनी याकडे लक्ष देऊन सर्व फलक तात्काळ हटवावे अशा सूचना त्यांनी केल्या. ते म्हणतात की, निवडणुकीत भुजबळांना पाडून टाकू, अरे पण भुजबळ किती लोकांना पाडेल हे बघा, निवडणुकीत जर अशी वाटणी झाली तर काय होईल असा इशारा त्यांनी दिला.भुजबळ म्हणाले की, छत्रपती संभाजी राजे म्हणाले की, छगन भुजबळ हे दोन जातीत वितुष्ट निर्माण करता आहे त्यांना मंत्रिपदावरून काढा. मला त्यांना सांगायचे आहे की, आमचे शाहू महाराज मागासवर्गीयांना पुढे घेऊन जाण्यासाठी लढत होते. त्याच गादीवर तुम्ही आहात तुम्ही एका समाजाची भूमिका का घेऊन बोलता. महाराज हे सर्व समाजाचे आहे. तुम्ही सांगायला हवे होत सगळ्यांचे आरक्षण शाबूत ठेवा. जेव्हा बीड मध्ये जाळपोळ झाली तेथे जाऊन त्यांचे अश्रू पुसायल हवे होते, हे पण तुमचे काम होत. वेगवेगळे समाज पक्ष यांच्या कडून माझी हीच अपेक्षा की आमचे पण म्हणणे ऐकून घ्या असेही ते म्हणाले.

# राज्यकर्ते हे जनतेचा नव्हे, निवडणुकांचा विचार करतात-मेधा पाटकर

# बिबी येथे दिव्यग्राम-२०२३ महोत्सव:मेधा पाटकर यांना जीवनगौरव, सारंग बोबडे यांना सेवार्थ पुरस्कार प्रदान







**चंद्रपूर - गडचिरोलीतील प्रश्नांवर वेधले लक्ष**
**मेधा पाटकर यांनी गडचिरोलीतील सुरजागड लोह प्रकल्पाविरोधात २५० दिवसांपासून सुरू असलेल्या आदिवासी आंदोलनाकडे लक्ष वेधून सरकार कंपण्यांची बाजू घेवून आदिवासींना विस्थापीत करण्याचे षडयंत्र करत आहे. अल्ट्राटेक कंपणीविरोधात सरपंच संघटना कामगारांच्या हितासाठी आंदोलन करत असूनही कंपणीचे दुर्लक्ष करत आहे. एकेकाळी जंगलांनी व्यापलेला चंद्रपूर जिल्हा आता ३० हून अधिक कोळसा खाणी, ५ सिमेंट कारखाने आणि ७ औष्णिक विद्युत युनिटचे केंद्र झाले आहे. यातून आर्थिक संपन्नता व पायाभूत विकास होत असला तरी गावं ओसाड होताना दिसतात. स्थानिकांना नोकऱ्या नाही. शेती क्षेत्र लयाला गेले आहे. प्रदूषण, तापमानवाढ व आरोग्याचे महाभयंकर प्रश्न आवासून उभे आहेत. या परिस्थितीत सजग नागरिकांनी एकत्रित येत लोकशाही मार्गाने प्रश्न विचारले पाहीजे. आपल्या हक्कांसाठी आपण लढा दिला पाहीजे, असे मत ही मेधा पाटकर यांनी यावेळी व्यक्त केले.**

**चंद्रपूर । प्रतिनिधी**

देशाला लुटण्याचे, संविधान आणि कायदे बदलण्याचे धोरण सत्ताधारी व उद्योगपती मिळून करत आहेत. विकासाच्या नावावर आदिवासींचे विस्थापन होत आहे. ३९ कायदे संपवून ग्रामसभा व लोकशाहीविरोधी ४ नवीन कायदे कंपण्या व पैशाची गुंतवणूक करणाऱ्यांसाठी सरकारने आणले. याविरुद्ध लढा देणाऱ्यांना विकासविरोधी, अर्बन नक्षल ठरवले जात आहेत. जल-जंगल-जमीन बचावासाठी देशभर जनआंदोलने करणारे आंदोलक हे संसाधन रक्षणाचे खरे अहिंसक सत्याग्रही आहेत. मात्र राज्यकर्ते हे जनतेचा विचार करणारे राहिले नाहीत, ते कमीशनखोरी करुन केवळ निवडणूकींचा विचार करतात. त्याचे परिणाम सर्वसामान्य जनता भोगत आहेत, असे घणाघाती प्रतिपादन नर्मदा बचाव आंदोलनाच्या प्रणेत्या, प्रख्यात सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर यांनी केले. समाजसेवक डॉ.गिरीधर काळे सामाजिक प्रतिष्ठान व सेवार्थ ग्रुप बिबी आयोजित दिव्यग्राम २०२३ महोत्सवात त्या बोलत होत्या. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शेतकरी नेते, माजी आमदार ड.वामनराव चटप, स्वागताध्यक्ष ड.स्नेहल संतोष उपरे, प्रमुख अतिथी म्हणून प्राचार्य डॉ.अनिल मुसळे, समाजसेवक डॉ.गिरीधर काळे, सामाजिक कार्यकर्ते ड.लालसू नोगोटी, नर्मदानगरचे सरपंच पुण्या वसावे, राहूल आसूटकर, अनंता रासेकर आदी मान्यवर उपस्थित होते. समाजसेवक डॉ.गिरीधर काळे सामाजिक प्रतिष्ठान व सेवार्थ गृपतर्फे यंदाचा राज्यातील सामाजिक क्षेत्रातील कार्यकर्त्यांना दिला जाणारा प्रतिष्ठेचा जीवनगौरव पुरस्कार नर्मदा बचाव आंदोलनाच्या प्रणेत्या, सामाजिक कार्यकर्त्या मेधा पाटकर व आश्वासक युवा सामाजिक कार्यकर्त्यांना प्रदान करण्यात येणारा नामांकित सेवार्थ पुरस्कार देशात सामाजिक कार्य व पिढीतांच्या सक्षमीकरणासाठी २५० कोटींहून अधिक रक्कम समाजाला थेट मदत करणा-या 'डोनेटकार्ट' कंपणीचे संस्थापक, फोर्ब्स यादीतील प्रभावशील तरुण ठरलेला चंद्रपूर येथील सारंग कालीदास बोबडे यांना सन्मानाने प्रदान करण्यात आला. दहा हजार रुपये रोख, शाल, श्रीफळ, सन्मानपत्र, ग्रामगिता असे पुरस्काराचे स्वरुप होते. मागील १२ वर्षांपासून बिबी येथे दिवाळी ही फटाकेमुक्त, ग्रामस्वच्छता व प्रबोधनात्मक दिव्यग्राम महोत्सवाने साजरी करण्यात येते. यावेळी ब्रिटीश सरकारचा चेव्हनिंग गोल्ड व्हालंटरिंग पुरस्कार प्राप्त ड.दीपक यादवराव चटप व महाराष्ट्र पोलीस सेवेत निवड झालेले विशाल नारायण उपरे यांचा विशेष सत्कार करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रास्ताविक स्वागताध्यक्ष ड.स्नेहल संतोष उपरे यांनी केले. संचालन अविनाश पोईनकर, तर आभार सचिन आस्वले यांनी मानले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी विठ्ठल अहिरकर, संदिप पिंगे, गणपत तुम्हाणे, संतोष बावणे, अनिल हिंगाणे, इराणा तुम्हाणे, सुरज मडावी, प्रमोद विरूटकर, राकेश बोबडे, सुरेंद्र मुसळे यासह युवक मित्रमंडळींनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला जिल्हा व परिसरातील अनेक मान्यवरांची उपस्थिती होती.

**कृतीशील युवकांच्या पाठीशी उभे रहावे - ॲड.वामनराव चटप**
**मेधाताईंचे कार्य सर्वश्रूत आहे. सारंग बोबडे या २६ वर्षीय तरुणाने पिढीतांच्या मदतीसाठी उभे केलेले काम प्रेरणादायी आहे. रम-रमा-रमी या तीन व्यसनांपासून दूर राहता आले तर आपल्याला प्रगतीपासून कुणीही रोखू शकत नाही. या तत्वाने ॲड.दीपक चटपची वाटचाल आश्वासक आहे. चार दशकांपासून डॉ.गिरीधर काळे यांनी लाखो अस्थिरुग्नांवर मोफत उपचार करुन बरे केले. ही कर्मयोगी माणसे समाजाचे भूषण आहे. बिबी येथील सेवार्थ गृपच्या युवकांनी १२ वर्षांपासून प्रबोधनाचा हा वसा घेतला. अशा कृतीशील युवकांच्या पाठीशी समाजाने भक्कम उभे रहावे, असे मत शेतकरी नेते व माजी आमदार ॲड.वामनराव चटप यांनी केले.**

## एकलव्य मॉडेल स्कूलमध्ये प्रवेशास संधी

**अहेरी । प्रतिनिधी**

एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प, अहेरी अंतर्गत एकलव्य मॉडेल रेसिडेन्सीअल इंग्रजी माध्यमाच्या स्कूलमध्ये अनुसूचित जाती ,जमातीच्या विद्यार्थ्यांना प्रवेश घेण्याकरिता दिनांक २५ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११.०० ते २:०० वाजेपर्यंत प्रवेशपूर्व परीक्षेचे आयोजन करण्यात आलेले आहे.




शैक्षणिक सत्र २०२४-२५ या वर्षाकरिता इयत्ता सहावी ते नववीच्या वर्गातील विद्यार्थी अनुशेष भरून काढण्यासाठी दिनांक २५ फेब्रुवारी २०२४ रोजी सकाळी ११.०० ते दुपारी २.०० वाजेपर्यंत एकलव्य रेसिडेन्सी मॉडेल स्कूल, अहेरी येथे परीक्षेचे आयोजन करण्यात येणार आहे. इयत्ता सहावीच्या प्रवेशा करिता १०० गुणांचा पेपर व सातवी ते नववी पर्यंतच्या प्रवेशाकरिता २०० गुणांचा पेपर घेण्यात येणार आहे. त्याकरिता इच्छुक व पात्र अनुसूचित जमाती तथा आदीम जमातीच्या पालकांचे वार्षिक उत्पन्न सहा लक्ष पेक्षा कमी आहे अशा विद्यार्थ्यांनी तथा पालकांनी परीक्षा आवेदन पत्र व सविस्तर माहिती करिता प्रकल्प कार्यालय, अहेरी येथे संपर्क करून दिनांक ३० जानेवारी २०२४ पर्यंत आवश्यक कागदपत्रांसह अर्ज सादर करावे, असे आवाहन सहाय्यक जिल्हाधिकारी तथा प्रकल्प अधिकारी वैभव वाघमारे यांनी केलेले आहे.

## तरुण पर्यावरणवादी मंडळांनी दिले खवल्या मांजरला जीवदान

**चिमूर । प्रतिनिधी**

तालुक्यातील शंकरपूर येथील एका महिलेच्या घरी रात्री खवल्या मांजर दिसून आले त्यांनी तरुण पर्यावरणवादी मंडळाच्या सदस्यांना बोलावले त्या मंडळाच्या सदस्यांनी खवल्या मांजर ला पकडून जीवदान दिले . येथील सुमन व्यवहारे यांच्या घरी शुक्रवारच्या मध्यरात्री खवल्या मांजर शिरले होते स्वयंपाक रूम मधून भांडे पडत असल्याने या महिलेने उठून पाहिले असता त्या महिलेला हा प्राणी दिसून आला त्यांनी लगेचच तरुण पर्यावरणामध्ये मंडळाचे सदस्य विजय गजबे यांना फोन करून बोलावून घेतले त्यांनी या खवल्या मांजरला शिताफीने पकडून वनविभागाच्या स्वाधीन केले येथील



पशुवैद्यकीय अधिकारी यांनी त्याची तपासणी करून ठणठणीत असल्याचे प्रमाणपत्र दिल्याने त्याला शंकरपूर येथील वाघाई जंगल परिसरात सोडण्यात आले हा सस्तन प्राणी असून निशाचर आहे बिळात राहत असून मुंग्या त्याचे खाद्य आहे असुरक्षित वाटल्यास शरीराचे वाटोळे करतो अशी माहिती आमोद गौरकर यांनी दिली. यावेळी वनपरिक्षेत्र अधिकारी के भी देऊळकर , वनरक्षक आर एस भुरले, व्ही डी सोनूने,प्रदीप ढोणे, जग्गू लांजेवार ,तरुण पर्यावादी मंडळाचे सदस्य विजय गजभे, साईश वारजूकर ,योगेश बारेकर, राजू वाढई , अनमोल चुनचूनवार , रितेश गजबे उपस्थित होते.

## रोगामुळे नुकसान झालेल्या धान पिकाचे ताबडतोब सर्वेक्षण करून अहवाल द्या

### विशेष बाब म्हणून मदत करण्यासाठी शासनाकडे धरणारा आग्रह-खा.मेंढे

**भंडारा । प्रतिनिधी**

भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यातील बहुतांश भागात आणि विशेषत्वाने पवनी आणि भंडारा तालुक्यातील धान पिकावर आलेल्या खोडकिडा आणि पेरवा रोग पीक विम्याच्या संकल्पनेत बसत नाही. मात्र धानाचे प्रचंड नुकसान झाले आहे. खरंतर कृषी विभागाचे अधिकारी आणि कर्मचारी यांनी स्वतःहून याचे सर्वेक्षण करून ही माहिती शासनाला देणे अपेक्षित होते. मात्र यंत्रणा आदेशाची वाट पाहत आहे. १९ नोव्हेंबर पर्यंत झालेल्या संपूर्ण नुकसानीचे सर्वेक्षण करून अहवाल सादर करावा, असे स्पष्ट निर्देश खासदार सुनील मेंढे यांनी आज जिल्हाधिकारी कार्यालयात घेतलेल्या बैठकीत दिले. पिक विमा खाली हे नुकसान येणार नसल्याने विशेष बाब म्हणून शासनाकडून भरपाई मिळावी यासाठी आपण प्रयत्न करू, असेही यावेळी खासदार सुनील मेंढे यांनी सांगितले.जिल्हाधिकारी कार्यालयात आज खासदार सुनील मेंढे यांनी विविध महत्त्वपूर्ण विषयांना घेऊन आढावा बैठक घेतली. या बैठकीत जिल्हाधिकारी योगेश कुंभेजकर यांच्यासह कृषी विभागाचे अधिकारी पात्रीकर, तालुका कृषी अधिकारी, धान खरेदीचा आढावा घेण्याच्या अनुषंगाने जिल्हा पणन अधिकारी आणि इतर अधिकारी उपस्थित होते.पावसाळ्यानंतर भंडारा आणि गोंदिया जिल्ह्यात धान पिकावर खोडकिडा आणि पेरवा हा रोग आला. यामुळे पवनी आणि भंडारा तालुक्यातील धान उत्पादक शेतकरी अधिक प्रभावित झाले. शेतकऱ्यांचे हाती आलेले पीक गेले. या नुकसानीचे अजून पर्यंत कृषी विभागाकडून सर्वेक्षण झालेले नाही. विशेष म्हणजे या रोगामुळे झालेले नुकसान हे पीक विम्याच्या कवचाखाली येत नसल्याने शेतकरी आधीच हवालदील झाला आहे. अशात त्यांच्यावर आलेल्या संकटाच्या संदर्भात सहानुभूतीपुर्वक विचार करणे कृषी विभागातील अधिकारी आणि कर्मचारी अशा प्रत्येकाची जबाबदारी आहे. शेतकऱ्यांना मार्गदर्शन आणि अडचणीच्या वेळी योग्य मार्ग दाखविण्याचे काम त्यांचे आहे. मात्र अधिकारी आणि कर्मचारी आदेशाची वाट पाहत असतात. हाच प्रकार याही बाबतीत झाला असून अजून पर्यंत झालेल्या नुकसानीचे सर्वेक्षण करण्यात आले नाही. त्यामुळे १९ नोव्हेंबर पर्यंत सर्व



नुकसानीचे पंचनामे करून अहवाल सादर करावा असे निर्देश या बैठकीत खासदार सुनील मेंढे यांनी दिले. आपले कर्तव्य समजून हे काम केल्यास आदेशाची वाट पाहण्याची वेळ येणार नाही. शासनाला आलेल्या परिस्थितीची जाणीव करून देण्याचे काम तुमची असतानाही, अजून पर्यंत या अनुषंगाने कुठल्याच हालचाली झाल्या नाही यासाठी खासदारांनी खेदही व्यक्त केला. तरी आपल्या कर्तव्याच्या बाबतीत गंभीर नसल्याची खंतही त्यांनी या बैठकीत व्यक्त केली. या रोगामुळे झालेल्या नुकसानीची भरपाई मिळावी म्हणून आपण शासनाकडे विशेष बाब सदराखाली मदत करावी यासाठी आग्रह धरणार असल्याचे त्यांनी सांगितले.यासोबतच धान खरेदी विषयाला घेऊनही आढावा घेतला गेला. शेतकऱ्यांच्या शेतातील लहान कापून तो विक्रीसाठी तयार आहे. मात्र अजून पर्यंत भान खरेदी केंद्र सुरू झालेले नाही. जिल्ह्यात २३२ खरेदी केंद्रांवर ऑनलाईन नोंदणी सुरू आहे. त्याचा लाभ शेतकऱ्यांनी घ्यावा. अ वर्ग केंद्र सुरू करण्यात आली असून ४० ते ५० केंद्र प्रस्तावातील त्रुट्यांची पूर्तता करून एक-दोन दिवसात सुरू करण्याचे निर्देश यावेळी खासदारांनी जिल्हा पण अधिकाऱ्यांना दिले. इतरही केंद्र शक्य तेवढ्या लवकर सुरू करून धान उत्पादक शेतकऱ्यांची होत असलेली तारांबळ थांबवावी. खाजगी व्यापाऱ्यांकडे जाण्याची वेळ त्यांच्यावर येऊ नये याची काळजी घ्यावी असे निर्देशही खासदारांनी दिले. छान विक्रीसाठी केंद्रावर येणाऱ्या शेतकऱ्यांना कोणताही त्रास होणार नाही याची खबरदारी घेण्याच्या सूचनाही करण्यात आल्या. बैठकीत इतरही काही महत्त्वाच्या विषयांवर खासदारांनी आढावा घेतला.

## युवकांच्या सर्वांगीण विकासासाठी खेळ महत्वाचे-अजय कंकडालवार

**भामरागड । प्रतिनिधी**

तालुक्यातील कोयनगुडा येथे कोयनगुडा क्रीडा मंडळ तर्फे ग्रामीण कबड्डी स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.आज या स्पर्धेचे उदघाटक म्हणून आविसं अजयभाऊ मित्र परिवारचे विदर्भ नेते व लोकप्रिय माजी जि.प.अध्यक्ष तथा अहेरी कृषि उत्पन्न बाजार समिती सभापती अजय कंकडालवार यांच्या शुभ हस्ते पार पडले.यावेळी कंकडालवार यांचा गावकऱ्यांनी रॅली काढून जंगी स्वागत केले.तसेच कंकडालवार यांच्या हस्ते सप्तरंगी ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले.या कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून लक्ष्मीकांत बोगामी,सरपंच नंदू चुक्कु महाका,प्रमुख पाहुणे विजय ओक्सा लाहेरी,लालसू आत्राम माजी उपसभापती प.स.भामरागड,सुधाकर तिम्मा तालुकाध्यक्ष आविसं अजयभाऊ मित्र परिवार,शामराव येलेकरवार,सुखराम मडावी माजी सभापती प.स.भामरागड प्रमोद आत्राम माजी सरपंच पेरमेली,विष्णू मडावी उपाध्यक्ष न.प.भामरागड होते.यावेळी अहेरी नगरपंचायतचे नगरसेवक प्रशांत गोडसेलवार,तपेश हलदार, डॉ.विजय



ओक्सा,निलेश वेलादी सरपंच ग्रा.प.मेडपल्ली,प्रवीण मोगलीवार, आकाश मोगलीवार, रामजी पूनगाटी उपस्थित होते.मंडळाचे अध्यक्ष सुरेश पुंगाटी,उपाध्यक्ष रामा मडावी,सहसचिव मोतीराम गावडे,सचिव संतोष हबका,कोषाध्यक्ष मनोहर हबका,वजनदारी जीवन मडावी,पंकज मडावी,महेश कुसरामी तर क्रीडा व्यवस्थापक रैनू तिम्मा, जीवन मडावी,विनीत पद्मावार,बिपीन उसेंडी,महेंद्र कुसरामी सह आविसं अजयभाऊ मित्र परिवारचे पदाधिकारी कार्यकर्ते तसेच गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## नागपूरमध्ये किल्ले चंद्रपुरची हुबेहूब प्रतिकृती साकारली

**नागपूर । प्रतिनिधी**

शिवछत्र प्रतिष्ठाण निर्मित काल्पनिक किल्ला प्रदर्शन भरविण्यात आले आहे. यात चंद्रपुरातील गोंडकालीन किल्ला, महाकाली मंदिर, राणी हिराइ आणि राजे बिरशाह यांची समाधी आणि सर्व ऐतिहासिक परिसर हुबेहूब आणि वस्तुनिष्ठ साकारला आहे. तेजस आकर्ते हे मुख्य कलाकार असून, तेजस कोडापे, शिव कायरवार, कान्हा वासनकर व समूहाच्या पुढाकाराने नागपूर येथील तुकडोजी चौक येथे प्रदर्शन भरविण्यात आले आहे.या प्रदर्शनात किल्ले चंद्रपुरचे प्रवेशद्वार, बुरुज, दरवाजे, महाकाली मंदिरातील मूर्ती, राणी हिराई आणि राजे बिरशाह यांची समाधी या सर्व गोष्टी हुबेहूब साकारल्या आहेत. या






प्रदर्शनामुळे चंद्रपुरातील ऐतिहासिक वारसा जतन होण्यास मदत होईल. या प्रदर्शनाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे. अनेक नागरिकांनी या प्रदर्शनाला भेट देऊन या कामाचं कौतुक केलं आहे.या प्रदर्शनाबाबत तेजस आकर्ते म्हणाले, चंद्रपुर हा गोंडकालीन इतिहासाचा एक महत्त्वाचा वारसा आहे. या वारशाला जतन करण्यासाठी आम्ही हे प्रदर्शन भरवले आहे. या प्रदर्शनामुळे चंद्रपुरच्या ऐतिहासिक वारसाबद्दल जागरूकता निर्माण होईल, अशी आशा आहे.. दरम्यान, राजे मुधोजी भोसले यांनी किल्ले चंद्रपुरला सदिच्छा भेट देऊन पुजन केल. व उपस्थित शिवभक्तांना शुभेच्छा दिल्या.